आस्थापना विभाग
दि. 04/07/2017

अंतर्गत कार्यालयीन टिपणी :– सर्व अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांस

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र – संकीर्ण 2017/प्र.क्र.81/17/का. सहा, मंत्रालय, मुंबई, दि. 6/5/2017 रोजीच्या आदेशान्वये माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री. सुहास हळदणकर यांची मुंबईत हत्या झालेली आहे. तेव्हा श्री. हळदणकर यांनी माहिती अधिकारात काही कार्यालयीन माहिती मागणी केली असल्यास ती तात्काळ देण्यात यावी. याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी आदेशाने कळविले आहे. यांची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव

माहितीचा अधिकार
Right to Information

सूचना का अधिकार

सामान्य प्रशासन विभाग
१९ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९५४३

क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.८१ /१७ /का.सहा

दिनांक : ०६.०५.२०१७.

प्रति,

सर्व सहसचिव/उपसचिव (आस्थापना)/ माहिती अधिकार समन्वयक,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय:- माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री.सुहास हळदणकर यांची मुंबईत हत्या — श्री.भास्कर प्रभू, मुंबई यांची तक्रार — मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश.

महोदय,

माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री.सुहास हळदणकर यांची मुंबईत हत्या झालेली आहे. सदर बाबीची दखल घेण्याची व माहिती मागविण्यांऱ्या अर्जदारांना संरक्षण मिळण्याची आणि या हत्येचा तपास शीघ्रतेने होऊन त्याबाबत फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविण्याची विनंती श्री.शैलेश गांधी, मुंबई यांनी मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे केली आहे. त्यावर उपरोक्त गुन्हयानुषंगाने शीघ्र तपास करण्याचे आदेश गृह विभागास, श्री. हळदणकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेडे गेल्या वर्षभरात केलेल्या व प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांवर कार्यवाही करून त्याबाबतची माहिती website वर उपलब्ध करून देण्याचे आदेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस व श्री. हळदणकर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य विभागात केलेल्या व प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांवर कार्यवाही करून त्याबाबतची माहिती website वर दि.१५.५.२०१७ पर्यंत उपलब्ध करून देण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त यांनी शासनास आदेशित केले आहे. मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या दि.१२.४.२०१७ च्या आदेशाची प्रत आपल्या माहितीस्तव सोबत जोडली आहे.

३. उपरोक्त बाब सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनीक प्राधिकरणे तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या देण्यात याव्यात अशी विनंती आहे..

आपला,

(सं.कृ भोसले)
शासनाचे उप सचिव.

सोबत — वरिलप्रमाणे.

प्रत- सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२. त्यांना विनंती करण्यात येते की, श्री.सुहास हळदणकर यांनी त्यांच्याकडे काही अर्ज दाखल केले असल्यास त्याबाबतची माहिती शासनास कृपया उपलब्ध करून द्यावी.
कार्यासन सहा संग्रहार्थ.
-श्री.भास्कर प्रभू,मुंबई.
२. त्यांना विनंती करण्यात येते की, श्री.हळदणकर यांच्या प्रलंबित अर्जाची माहिती शासनास कृपया उपलब्ध करुन द्यावी.

Order of State Chief Information Commissioner - regarding review of Suhas Haldankars applications in RT

महाराष्ट्र शासन

E-mail-rajendra.jadhav62@nic.in
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५७-१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, ४३१ (विस्तार),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २६ मे, २०१७.

प्रति,

उपसचिव ( महाविद्यालयीनशिक्षण /विद्यापीठशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री.सुहास हळदणकर यांची मुंबईत हत्या-
श्री.भास्कर प्रभु, मुंबई यांची तक्रार-मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे
आदेश...

उपरोक्त विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.८१/१७/का.सहा. दि.६.५.२०१७ रोजीचे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रासह सोबत जोडले आहे.

माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री. सुहास हळदणकर यांची मुंबईत हत्या झालेली आहे. सदर बाबीची दखल घेण्याची व माहिती मागविणा-या अर्जदारांना संरक्षण मिळण्याची आणि आणि या हत्येचा तपास शीघ्रतेने होऊन त्याबाबत फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याची विनंती श्री. भास्कर प्रभु, मुंबई यांनी मा. राज्य माहिती आयुक्त यांचेकडे केली आहे.

उपरोक्त गुन्ह्याच्या अनुषंगाने शीघ्र तपास करण्याचे आदेश गृह विभागास, श्री. हळदणकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे गेल्या वर्षभरात केलेल्या व प्रलंबित असलेल्या माहिती अर्जावर कार्यवाही करुन त्याबाबतची माहिती website वर उपलब्ध करुन देण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस व श्री. हळदणकर यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य विभागात केलेल्या व प्रलंबित असलेल्या माहिती अर्जावर कार्यवाही करुन त्याबाबतची माहिती website वर दि.१५.५.२०१७ पर्यंत उपलब्ध करुन देण्याचे मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी शासनास आदेशित केले आहे.

तरी विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील श्री. हळदणकर यांनी माहितीसाठी अर्ज केले असतील व जे प्रलंबित असतील अशा अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत संबंधीतांच्या निदर्शनास आणावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास तात्काळ सादर करावा तसेच या कार्यासनासही अवगत करण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(रा.वि.जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

SHIVAJI UNIVERSITY.
Registrar's Office.
Date 20 JUN 2017
Inward No. 1133
To Whom Est

C:\Users\shirish padolya\Documents\क्र.CH_..._२०१७.docx

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Date 20/6/2017
Inward No - 1133
To Whom